# बृहन्मुंबई महानगरपालिका

विषयः- दि.०१ मे, २०२६ महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्याबाबत

संदर्भः- क्र.सीईआर–२०२६/प्र.क्र.८३/राशि-१, दि.२३ एप्रिल २०२६

दि.०१ मे, २०२६ महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्याबाबतच्या महाराष्ट्र शासनाच्या संदर्भाधीन परिपत्रकाच्या प्रती सर्व खातेप्रमुख / सहाय्यक आयुक्त यांना माहितीकरिता व योग्य त्या कार्यवाहीकरिता प्रसारित करण्यात येत आहेत.

तसेच प्रस्तुत परिपत्रक http://portal.mcgm.gov.in आणि http://mybmcemp.mcgm.gov.in /circulars या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात येत आहे.

सही/-२९.०४.२०२६
(शारदा शा.गोसावी)
प्रमुख कर्मचारी अधिकारी

सही/-२९.०४.२०२६
(किशोर गांधी)
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्रमांक:प्रकअ/२३५/सर्वसा/(एमओपी/६१५)
दिनांक:२९.०४.२०२६

प्रत--------------------------------------------------------(जादा----------- प्रतीसह)

माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

L.L.Cardoza 29/4/26

(लिआना लॉ. कार्डोझ)
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय

29/4/2026

**दि. १ मे, २०२६ महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
क्र.सीईआर-२०२६/प्र.क्र.८३/राशि-१,
सामान्य प्रशासन विभाग,
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २३ एप्रिल, २०२६.

**शासन परिपत्रक**

महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस समारंभ दि. १ मे, २०२६ रोजी साजरा करण्यात येत आहे. त्या निमित्ताने परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्यभर कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत असे शासनाने ठरविले आहे. त्याप्रमाणे सर्व संबंधितांनी कार्यवाही करावी:-

अ) मुंबई, विभागीय मुख्यालये, जिल्हा मुख्यालये, उपविभागीय मुख्यालये, तहसिल मुख्यालये तसेच इतर सर्व ठिकाणी ध्वजवंदनाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी ८.०० वाजता आयोजित करण्यात यावा. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे, यासाठी इतर कार्यालयाने अथवा संस्थेने या दिवशी सकाळी ०७.१५ ते ०९.०० च्या दरम्यान ध्वजवंदनाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्धशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजवंदन समारंभ आयोजित करायचा असल्यास त्यांनी तो सकाळी ०७.१५ च्या पूर्वी किंवा सकाळी ०९.०० च्या नंतर आयोजित करावा.

ब) मुंबई, विभागीय मुख्यालये व जिल्हा मुख्यालये या ठिकाणी ध्वजवंदनाच्या कार्यक्रमाबरोबरच पोलीस, गृहरक्षक दले, नागरी संरक्षण दले, अग्निशामक दले इत्यादींचा समारंभीय संचलनाचा कार्यक्रम आयोजित करावा.

क) मुंबई तसेच विभागीय व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी व इतरत्र शासकीय इमारतींवर विद्युत रोषणाई करण्यात यावी.

**२. मा. राज्यपाल हे शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजवंदन करतील.**

३. विभागीय व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे पालकमंत्री/ मंत्री / राज्यमंत्री ध्वजवंदन करतील :-

| अ.क्र. | पालकमंत्री / मंत्री / राज्यमंत्री | जिल्ह्याचे नाव |
|---|---|---|
| १) | श्री. एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे | ठाणे |
| २) | श्रीमती सुनेत्रा अजित पवार | पुणे |
| ३) | श्री. चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे | नागपूर |
| ४) | श्री. राधाकृष्ण सिंधूताई एकनाथराव विखे-पाटील | अहिल्यानगर |
| ५) | श्री. हसन सकिना मियालाल मुश्रीफ | नंदूरबार |
| ६) | श्री. चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चु पाटील | सांगली |
| ७) | श्री. गिरीश गिता दत्तात्रय महाजन | नाशिक |
| ८) | श्री. गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक | पालघर |
| ९) | श्री. गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील | जळगाव |
| १०) | श्री. दादाजी रेश्माबाई दगडू भुसे | अमरावती |
| ११) | श्री. संजय प्रमीला दुलीचंद राठोड | यवतमाळ |
| १२) | श्री. मंगलप्रभात प्रेमकंवर गुमनमल लोढा | मुंबई शहर |
| १३) | श्री. उदय स्वरुपा रविंद्र सामंत | रत्नागिरी |
| १४) | श्री. जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल | धुळे |
| १५) | श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे | जालना |
| १६) | श्री. अतुल लिलावती मोरेश्वर सावे | नांदेड |
| १७) | डॉ. अशोक जनाबाई रामाजी वुईके | चंद्रपूर |
| १८) | श्री. शंभूराज विजयादेवी शिवाजीराव देसाई | सातारा |
| १९) | ॲड. आशिष मिनल बाबाजी शेलार | मुंबई उपनगर |
| २०) | श्री. दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे | वाशिम |
| २१) | कु. आदिती वरदा सुनिल तटकरे | रायगड |
| २२) | श्री. शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले | लातूर |
| २३) | श्री. जयकुमार कमल भगवानराव गोरे | सोलापूर |
| २४) | श्री. नरहरी सावित्रीबाई सिताराम झिरवाळ | हिंगोली |
| २५) | श्री. संजय सुशिला वामन सावकारे | गोंदिया |
| २६) | श्री. संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट | छत्रपती संभाजीनगर |
| २७) | श्री. प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक | धाराशिव |
| २८) | श्री. मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील) | बुलढाणा |
| २९) | श्री. नितेश निलम नारायण राणे | सिंधुदुर्ग |
| ३०) | श्री. आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर | अकोला |
| ३१) | श्री. बाबासाहेब शातांबाई मोहनराव पाटील | बीड |
| ३२) | श्री. प्रकाश सुशिला आनंदराव आबिटकर | कोल्हापूर |
| ३३) | ॲड. आशिष उमादेवी नंदकुमार जयस्वाल | गडचिरोली |
| ३४) | श्रीम. माधूरी मिरा सतिश मिसाळ | भंडारा |
| ३५) | डॉ. पंकज कांचन राजेश भोयर | वर्धा |
| ३६) | श्रीमती मेघना दिपक साकोरे - बोर्डीकर | परभणी |

४. विभागीय व जिल्हा मुख्यालयाच्या इतर ठिकाणी अनुक्रमे संबधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी ध्वजवंदन करतील. तसेच तालुका मुख्यालयांच्या ठिकाणी शासनाच्या शासन परिपत्रक क्रमांक: सीईआर-१०१५/९०१/३०, दिनांक २२ एप्रिल, २०१५ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार विधानसभा/ विधानपरिषद सदस्य ध्वजवंदन करतील. ध्वजवंदन करणारे मंत्री महोदय व लोकप्रतिनिधी काही अपरिहार्य कारणांमुळे कार्यक्रमस्थळी वेळेवर पोहोचू न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकाऱ्यांनी तसेच तालुका मुख्यालयी तहसिलदार यांनी ध्वजवंदन करावे व ध्वजवंदनाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी.

५. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व नेहमी संचलनात भाग घेणाऱ्या पथकांच्या अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करुन मुंबई, विभागीय मुख्यालये व जिल्हा मुख्यालये येथे संयुक्त संचलनाची व्यवस्था करावी.

**६. सावधान स्थितीत येऊन वंदे मातरम् गीत म्हणण्यात यावे / वाजविण्यात यावे. तद्नंतर राष्ट्रध्वजाला वंदन करताना "राष्ट्रगीत" म्हणण्यात यावे / वाजविण्यात यावे व त्यानंतर लगेचच सावधान स्थितीत येऊन "राज्यगीत" वाजविण्यात यावे. ध्वजवंदन समारंभ अध्यक्षस्थान स्विकारणाऱ्या मान्यवरांनी / अधिकाऱ्यांनी अशा प्रसंगी भाषण करावे किंवा नाही हे स्वत: ठरवावे. सलामीच्या वेळी सज्ज असलेला बँन्ड सलामीपूर्वी व सलामीनंतर वाजविण्यास हरकत नाही.**

७. राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक एफएलजी-१०९१/३०, दिनांक २ मार्च, १९९१ तसेच क्रमांक एफएलजी-१०९१/(२)/३०, दिनांक ५ डिसेंबर, १९९१ तसेच क्रमांक एफएलजी-१०९८/(ध्वजसंहिता)/३०, दिनांक ११ मार्च, १९९८ अन्वये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. ध्वजवंदनाची रंगीत तालीम घेतली जाईल याची दक्षता घेण्याबाबत सर्व संबंधितांना सूचना द्याव्यात. राष्ट्रध्वज सुस्थितीत असल्याबाबत व सूर्यास्तास उतरवला जाईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

८. महाराष्ट्र दिनाच्या समारंभाला सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित रहातील याची दक्षता घ्यावी.

९. उत्सव अथवा औपचारिक प्रसंगी परिधान करावयाचा राष्ट्रीय पोषाख महाराष्ट्र दिन समारंभ प्रसंगी उपस्थित राहणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनी व व्यक्तींनी परिधान करावा असा सल्ला त्यांना मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी व सर्व संबंधित विभाग / कार्यालय प्रमुख यांनी द्यावा.

१०. स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, शहिद जवानांच्या पत्नी व आई-वडील यांना सन्मानाने निमंत्रित करावे.

११. अधिकाधिक नागरिकांना हा सोहळा घरबसल्या पाहता यावा, यासाठी वेबसाईटद्वारे थेट प्रक्षेपण करण्याचा प्रयत्न करावा.

१२. दिवसभरातून विविध कार्यक्रम जसे :- वृक्षारोपण, आंतर शालेय/आंतर महाविद्यालय स्तरावर वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजूषा/देशभक्तीपर निबंध व कविता स्पर्धांचे आयोजन करावे. प्रभात फेऱ्या काढण्यात याव्यात. सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध खेळांचे आयोजन करण्यात यावे. शासकीय इमारतीवर विद्युत रोषणाई करावी, एनएसएस व एनवायकेएस द्वारे देशभक्तीपर मोहिम राबविण्यात यावी, तसेच सोशल मिडीया व Digital माध्यमाद्वारे देशभक्तीपर किंवा राष्ट्रीय एकात्मते संबंधातील गाण्यांचा प्रचार करावा/संदेश द्यावा, याप्रमाणे महाराष्ट्र दिन साजरा करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GOVERNMENT OF MAHARASHTRA
GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
MUMBAI
(Protocol)

( अविनाश सोलवट )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्रमांक : सीईआर-२०२६/प्र.क्र. ८३ /राशि-१
सामान्य प्रशासन विभाग,
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २३ एप्रिल, २०२६.

प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
सर्व अपर मुख्य सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग,
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री ( नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री ( राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्याक व औकाफ ) यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (राजशिष्टाचार) यांचे खाजगी सचिव
राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई (२ प्रती),
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (५ प्रती) (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण, मुंबई (पत्राने)
फ्लॅग ऑफिसर कमांडिंग इन चीफ, वेस्टर्न नेव्हल कमांड, शहीद भगतसिंग रोड, मुंबई,
जनरल ऑफिसर कमांडिंग, महाराष्ट्र व गुजरात विभाग, कुलाबा, मुंबई,
एअर ऑफिसर कमांडिंग, हेडक्वार्टर्स, मेरीटाईस एअर ऑपरेशन्स, आयएफ, बिल्डींग, धोबी तलाव, मुंबई-४०० ०२०
स्टेशन कमांडर, इंडियन एअर फोर्स स्टेशन, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग (विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांना कळविण्याच्या विनंतीसह)
केंद्र संचालक, दूरदर्शन, वरळी, मुंबई-४०० ०१८
केंद्र संचालक, आकाशवाणी, मुंबई, नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर
पोलीस आयुक्त, मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, नवी मुंबई
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
सर्व पोलीस उप महानिरिक्षक
महासमादेशक, नगरसेना, मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई (पत्राने)
महालेखापाल-२, महाराष्ट्र, नागपूर (पत्राने)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, जुने सचिवालय, मुंबई.
मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
सभापती / उप सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद यांचे खाजगी सचिव
मुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी, मुंबई
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, सेंट्रल बिल्डींग, पुणे
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग-१, मुंबई,
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग-२, मुंबई
कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग / दक्षिण मुंबई विद्युत विभाग, मुंबई
संचालक, उद्याने व उपवने, बांधकाम भवन, मुंबई.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
MUMBAI (Protocol)
GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

(अविनाश सोलवट)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय
27 APR 2026
समय ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८
क्रमांक MOP/615

## परिशिष्ट-अ

**महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस - दिनांक १ मे, २०२६**

### मुंबई

| | | |
|---|---|---|
| **सकाळी** | **७-१५** | मा.मुख्यमंत्री व इतर मान्यवरांच्या हस्ते हुतात्मा चौकातील हुतात्मा स्मारक येथे हुतात्म्यांना पुष्पचक्र अर्पण करण्याचा कार्यक्रम होईल. |
| **सकाळी** | **८-००** | शिवाजी पार्क येथे ध्वजवंदन व संचलन |

### विभागीय व जिल्हा मुख्यालये

| | | |
|---|---|---|
| **सकाळी** | **८-००** | ध्वजवंदन<br>संयुक्त संचलन |

### उप विभागीय व तहसिल मुख्यालये व इतर ठिकाणी

| | | |
|---|---|---|
| **सकाळी** | **८-००** | ध्वजवंदन<br>संयुक्त संचलन |

.................................................................................................................

घ-११

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**३ रा मजला, मंत्रालय,**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.**

**दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२३३६१**

---

**क्रमांक : संकिर्ण-२०२५/प्र.क्र.८३/राशि-१** दि. २१ एप्रिल, २०२६

प्रति,

**१. सर्व विभागीय आयुक्त,**

**२. सर्व जिल्हाधिकारी**

**विषय : दि. ०१ मे, २०२६ रोजी महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस यामध्ये आवश्यक बदल करण्याबाबत.**

महोदय / महोदया,

राज्यभर दि. ०१ मे, २०२६ रोजी महाराष्ट्र दिन साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिक, अधिकारी व कर्मचारी उपस्थीत असतात. भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रातील काही भागांमध्ये उष्णतेची लाट (Heat Wave) निर्माण होण्याची शक्यता वर्तवली आहे. उष्णतेची लाट असल्याने नागरिक, अधिकारी व कर्मचारी यांना आरोग्याच्या दृष्टीने धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यानुषंगाने सदर कार्यक्रमामध्ये आवश्यक ती खबरदारी घेण्यात यावी. तसेच आरोग्याच्या दृष्टीने कार्यक्रमामध्ये काही बदल करावयाचे असल्यास संबंधित मा. पालकमंत्री यांच्या मान्यतेने बदल करण्यात यावेत, ही विनंती.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
MUMBAI
(Protocol)
GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

आपला,

(अविनाश सोलवट)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. मुख्यमंत्री / मा. उपमुख्यमंत्री / मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

२) मा. मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहायक.